आजचा दिनविशेष
१८४६ : इंग्लिश खगोलशास्त्रज्ञ विल्यम लासेल यांनी नेपच्यूनचा सर्वात मोठा चंद्र ट्रायटन शोधला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५ | अंक २८८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# विखे पाटील मनोज जरांगेंच्या भेटीसाठी अंतरवालीत, बंद दाराआड चर्चा, पडद्यामागे घडामोडींना वेग

राज्यात मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर हैदराबाद गॅझेट लागू करण्यात आलं आहे, राज्यात हैदराबाद गॅझेट लागू झाल्यानंतर आता मराठा समाज आणि ओबीसी समाज आमने-सामने आल्याचं पाहायला मिळत आहे. ओबीसी समाज प्रचंड आक्रमक झाला आहे, मराठा समाजाला आमच्यामधून आरक्षण देण्यात येऊ नये, त्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावं, अशी भूमिका ओबीसी समाजाची आहे. ओबीसी समाजाकडून या आरक्षणाला विरोध होत आहे.

काही दिवसांपूर्वीच ओबीसी नेत्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची बैठक पार पडली होती, या बैठकीला मंत्री छगन भुजबळ, ओबीसी नेते विजय वडेट्टीवार, मंत्री पकंजा मुंडे यांच्यासह प्रमुख ओबीसी नेत्यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये भुजबळ यांनी चांगलीच आक्रमक भूमिका घेतल्याचं पहाला मिळालं. तर दुसरीकडे सरकारने काढलेला जीआर शासनाने रद्द करावा अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली होती, तर पंकजा मुंडे यांनी आतापर्यंत वाटण्यात आलेल्या कुणबी प्रमाणपत्रांची श्वेतपत्रिका काढावी असं म्हटलं होतं.दरम्यान त्यानंतर आता घडामोडींना वेग आला आहे, मंत्री आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी अंतरवालीमध्ये जाऊन आज मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे, यावेळी दोघांमध्ये बंद दाराआड चर्चा देखील झाली, ही भेट नेमकी कशासाठी आहे? याच कारण अजून स्पष्ट झालेलं नाहीये, मात्र सध्या ओबीसी समाजाकडून मराठा समाजाला ओबीसीतून मिळणाऱ्या आरक्षणाला प्रचंड विरोध होत आहे,



## ओबीसी समाजाचा विरोध

ओबीसी समाजाकडून हैदराबाद गॅझेटला विरोध होत आहे, हैदराबाद गॅझेट रद्द करावं अशी मागणी वारंवार ओबीसी समाजाकडून करण्यात येत आहे, या पार्श्वभूमीवर ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी चांगलीच आक्रमक भूमिका घेतली आहे, आमचा मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध नाही, मात्र त्यांना स्वतंत्र आरक्षण द्याव, ओबीसीमधून आरक्षण देऊ नये, अशी मागणी भुजबळ यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर आजची भेट महत्त्वाची मानली जात आहे.

## कार्तिक पौर्णिमेला येणाऱ्या दिंड्यांनी सुरक्षा नियम पाळावेत
### श्रीक्षेत्र कपिलधार देवस्थान पंचकमिटीचे आवाहन

बीड (प्रतिनिधी) श्रीक्षेत्र कपिलधार येथे नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या कार्तिक पौर्णिमा यात्रोत्सवात सहभागी दिंड्यांना रस्त्यावरून चालताना सुरक्षिततेसाठी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन श्रीक्षेत्र कपिलधार देवस्थान पंचकमिटीन केले आहे. यंदा 4 ते 6 नोव्हेंबर रोजी करण्यात आले असून, महाराष्ट्रासह आंध्र, कर्नाटक आणि तेलंगण येथील भाविक मोठ्या संख्येने दिंड्या घेऊन सहभागी होणार आहेत. पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्रासह बाहेरील राज्यातून कार्तिक पौर्णिमेच्या यात्रोत्सवासाठी दिंड्या घेऊन भाविक कपिलधार येथे दाखल होतात. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्याने दिंडी मार्गावर सहभागी प्रत्येक भाविकाने रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावे, अचानक रस्ता ओलांडू नये आणि रात्रीच्या वेळी रिफ्लेक्टिव्ह पट्टे असलेले कपडे वापरावेत. दिंडीच्या पुढे व मागे सावधगिरीचे वाहन ठेवावे, ज्यामुळे अपघात टाळता येईल. कुठे अपघात झाल्यास तत्काळ जबाबदार व्यक्तीला किंवा पोलिसांना माहिती द्यावी. दिंडी प्रमुखांनी दिंडीपुढे स्पीकर लावावा. संरक्षणासाठी दिंडी मार्गावर येणाऱ्या प्रत्येक पोलिस ठाण्यात दोन दिवस आधी लेखी अर्ज सादर करावा. यामुळे पोलिसांनी आवश्यक मनुष्यबळ तैनात करुन वाहतूक नियंत्रण व सुरक्षा व्यवस्था करता येईल. मुक्कामाच्या ठिकाणाहून दिंडी मार्गस्थ करताना पहाटे उजेड झाल्यानंतर साधारण सकाळी 6 वाजता निघावे. या सूचनांचे पालन केल्यास गर्दीत अपघात, गोंधळ टाळता येईल आणि यात्रोत्सवाचा पारंपरिक उत्साह सुरक्षितपणे अनुभवता येईल, असे आवाहन पंचकमिटीने केले आहे.

## कपिलधारवाडीत भीतीचे वातावरण कायम
### भूगर्भ सर्वेक्षण पथकाची पाहणी, तातडीने पुनर्वसनाचे निर्देश

बीड प्रतिनिधी पाली अंतर्गत कपिलधारवाडी येथे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या व अतिवृष्टीमुळे जमिनीचा पृष्ठभाग खचला असून, अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत तसेच रस्त्यांवर खोल भेगा पडल्या आहेत. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भूस्खलनग्रस्त क्षेत्राचा आढावा घेण्यासाठी भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाचे (GSI) संचालक मेगो चासी आणि वरिष्ठ भूवैज्ञानिक संदीपकुमार शर्मा यांनी बुधवारी स्थळाची पाहणी केली. त्यांनी प्राथमिक निरीक्षण अहवाल सादर करत नमूद केले की, संबंधित भागात पाण्याचा नैसर्गिक निचरा न झाल्याने भूपृष्ठाखाली पाणी साचले आहे आणि त्यामुळे भूस्खलनाची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. काही कुटुंबांवर तत्काळ धोका असल्याने त्यांचे तात्पुरते पुनर्वसन आवश्यक असल्याचे त्यांनी सुचविले. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रशासनास प्रतिबंधात्मक आणि पुनर्वसनात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक



यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अधिकारी बैठक घेऊन परिस्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने स्थलांतरित कुटुंबांसाठी मन्मथस्वामी देवस्थान परिसरात तात्पुरती निवारा व अन्नाची व्यवस्था केली आहे. महिलांना साड्या व आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले असून, मदतकार्य व पाहणीसाठी अधिकाऱ्यांची सतत उपस्थिती आहे. प्रशासनाने नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन करत सांगितले की, “परिस्थिती नियंत्रणात असून प्रत्येक कुटुंबाच्या सुरक्षिततेची जबाबदारी प्रशासनाने घेतली आहे.

## सशक्त युवक सशक्त प्रभाग रोहित फावडे यांच्या नावाची वॉर्ड क्र. ४ मधून जोरदार चर्चा

धारूर / प्रतिनिधी

किल्ले धारूर नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू होताच शहरातील सर्व वार्डात राजकीय हालचालींना वेग आला आहे.याच आगामी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ मध्ये सामाजिक कार्यकर्ते रोहित फावडे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. नागरिक, युवक आणि महिला वर्गामध्ये त्यांच्या कार्याचा चांगला प्रभाव असून, विकासाभिमुख आणि प्रामाणिक नेतृत्व म्हणून त्यांची ओळख झाली आहे.

रोहित फावडे ही मागच्या अनेक वर्षापासून नागरिकांच्या संपर्कात असल्याने नागरिकांच्या प्रत्यक्ष जाऊन अडीअडचणी समस्या जाणून घेत सोडवण्याचा प्रयत्न करत असतात.

तरुण नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे रोहित फावडे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत परिसरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, दिव्यांचे व्यवस्था, तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी त्यांनी सातत्यानी पाठपुरावा करून कामे करून घेतले आहेत. स्वच्छता, रस्ते दुरुस्ती आणि



शिक्षण या क्षेत्रात उल्लेखनीय कामे केली आहेत.नागरिकांच्या समस्या ओळखून त्यावर तोडगा काढण्यासाठी ते नेहमी तत्पर राहिले आहेत.स्थानिक नागरिक विकास हवा असेल तर रोहित फावडे यांनाच निवडूया म्हणत त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवत आहेत. माध्यमांशी बोलताना रोहित फावडे म्हणाले नागरिकांचा विश्वास हीच माझी ताकद आहे. प्रत्येक कुटुंबाचा प्रश्न माझा स्वतः चा समजून मी काम करीन. सोशल मीडियावर त्यांच्या प्रचाराची चर्चा रंगू लागली असून, या प्रभागातील निवडणूक अत्यंत रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत. लोकसंपर्क मोहिमेमुळे त्यांचे नाव चर्चेत राहणार हे निश्चित दिसते.

## सौ. के.एस.के. महाविद्यालयाची तायक्वाँदो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

बीड : प्रतिनिधीः नुकत्याच झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व आय.बी.पी. महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन तायक्वाँदो स्पर्धेत सौ. के.एस.के महाविद्यालयाचा देवेंद्र जोशी यांने 68 किलो वजनगटात एकतर्फी विजय संपादीत करुन प्रथम क्रमांक मिळवत सुवर्ण पदक प्राप्त केले. तर कांबळे प्रतिक या खेळाडूने 63 किलो वजनगटात अंतिम फाईटमध्ये कडवी झुंज देत द्वितीय क्रमांक मिळवत सिल्वर पदक प्राप्त केले. तर सागर केळगंद्रे या खेळाडून 54 किलो वजनगटात उपांत्यफेरी पर्यंत उत्कृष्ट अशा दोन फाईटमध्ये नेत्रदिपक कामगिरी केली. अखिल



भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संघातून देवेंद्र जोशी हा 68 किलो वजन गटात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणार आहे. खेळाडूंच्या या कामगिरीबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष डॉ. भारतभुषण क्षीरसागर, संचालक डॉ. सारीका क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमवि चे उपप्राचार्य नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री जालिंदर कोळेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. भागचंद सानप, अमृतसिंग बिसेन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.

## सुदामा कृष्ण भेटीने भागवत कथेचा झाला समारोप
### आज होणार शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा



गेवराई दि.९ (प्रतिनिधी) माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेचा समारोप कृष्ण सुदामा च्या भेटीने करण्यात आला. यावेळी भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेची सांगता केली. यावेळी त्यांनी सुदामा कृष्ण भेट कथन केली त्यावेळेस उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू उभा राहिले. याप्रसंगी माजी मंत्री शिवाजीराव पंडित, आ. विजयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासहहभाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त समाधान समाधान महाराज शर्मा यांच्या भागवत कथेचा समारोप झाला. यावेळी गेवराई शहरासह ग्रामीण भागातून भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिष्टचिंतन सोहळा समितीने परिश्रम घेतले.

## भूस्खलनग्रस्त कपिलधारवाडी ग्रामस्थांना श्रीक्षेत्र कपिलधार देवस्थानचा आधार
### जिल्हा प्रशासन व कपिलधार देवस्थानच्या संयुक्त विद्यमाने ग्रामस्थांना मिळाला दिलासा

बीड (प्रतिनिधी) बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे झालेल्या भूस्खलनानंतर ग्रामस्थांना श्रीक्षेत्र कपिलधार देवस्थानने आश्रय दिला असून, त्यांच्या निवास, भोजन व पिण्याच्या पाण्यापासून सर्व आवश्यक सोयी देवस्थान आणि प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्या आहेत. या सामाजिक पुढाकारामुळे संकटग्रस्त ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. कपिलधारवाडी हे गाव अनेक वर्षांपासून डोंगराच्या पायथ्याशी वसलेले आहे. अलीकडील परतीच्या पावसाने जिल्हाभरात पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे



मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याच काळात रस्ता खचल्याने कपिलधारवाडी येथे भूस्खलनजन्य परिस्थिती निर्माण झाली. या घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने ग्रामस्थांची सुरक्षिततेसाठी स्थलांतर प्रक्रिया सुरू केली. भूस्खलनग्रस्त ग्रामस्थांना तातडीने श्रीक्षेत्र कपिलधार येथे हलविण्यात आले. श्री



कपिलधार देवस्थानच्या वतीने सुमारे तीनशेहून अधिक महिला व पुरुष ग्रामस्थांची जेवणासह राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. गेल्या 30 सप्टेंबरपासून जिल्हा प्रशासन आणि देवस्थानच्या संयुक्त प्रयत्नातून चहा, नाश्ता, आरओ पाण्याची सोय, वीज पुरवठा खंडित झाल्यावर जनरेटर तसेच मुक्कामासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. दिवसभर काम, रात्री कपिलधारला मुक्काम श्री क्षेत्र कपिलधार येथे सकाळी चहा, नाश्ता झाल्यानंतर ग्रामस्थ आपल्या दैनंदिन कामांसाठी गावाकडे जातात आणि रात्री मुक्कामासाठी कपिलधार येथे आल्यावर जेवण करुन आराम करतात. देवस्थान आणि प्रशासनाने एकत्र येऊन दाखविलेल्या या मानवी सहकार्यामुळे गावकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. स्थानिक ग्रामस्थांनी देवस्थानाच्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली असून, अशा संकटाच्या काळात देवस्थानने खऱ्या अर्थाने आधार दिला अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## जर्मनीने महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, देवेंद्र फडणवीस



भारताच्या प्रमुख न्यूज नेटवर्क टीव्ही 9 नेटवर्कद्वारा आयोजित न्यूज 9 ग्लोबल समिटची दूसरी आवृत्ती गुरुवारी जर्मनीच्या स्टटगार्ट येथे सुरु झाली आहे. समिटमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हर्च्युअल रुपाने सहभागी होत भारत आणि जर्मनीच्या संबंधावर प्रकाश टाकला. याच वेळी सीएम देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र आणि जर्मनीचे ऋणानुबंध जाहीर करत जर्मनीतून होणाऱ्या गुंतवणूकीसाठी महाराष्ट्र हे उपयुक्त क्षेत्र असल्याचेही म्हटले आहे. भारत-जर्मनी दरम्यान दृढ संबंध

ते म्हणाले की जर्मनी युरोपातील औद्योगिक आणि तांत्रिक प्रगतीचा महत्वाचा घटक आहे. आणि भारत आणि महाराष्ट्राचा प्रदीर्घकाळापासूनचा विश्वासू मित्र राहिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही देशात दरम्यानचे नाते आणखीन मजबूत झाले आहे. दोन्ही देशात व्यापार आणि कराराचा उद्देश्य भविष्यातील उद्योग आणि गुंतवणूकीचे वातावरण तयार करणे हा आहे.

ग्रीन हायड्रोजन, स्मार्ट मोबिलिटी, डिजिटल इनोव्हेशन आणि स्कील्ड डेव्हलपमेंट यात आमचे सहकार्य सातत्याने वाढत आहे. आणि आम्ही ग्लोबल इकॉनॉमित योगदान देत आहोत असेही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. जर्मनी इंजिनिअरिंग एक्सलेन्सच्या क्षेत्रात सहकार्य करत आहे. तर भारत एनर्जी आणि जागतिक स्तरिय मूलभूत सुविधांमध्ये सहकार्य करत आहे. इंडिया EU फ्री ट्रेड एग्रीमेंटच्या दिशेने पुढे चालला आहे, जी रोजगाराची अमूल्य संधी देणार आहे.

येथे पोस्ट पाहा –

“To our German friends, Maharashtra is your partner in growth and innovation and long term success. Let us walk this path together towards a brighter, shared future” Maharashtra CM @Dev_Fadnavis at #News9GlobalSummit2025 pic.twitter.com/1YMQx2s8gv

— News9 (@News9Tweets) October 9, 2025

महाराष्ट्रात गुंतवणूकीसाठी दिले निमंत्रण

देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले की आमच्या दरम्यान 1.9 दशलक्ष लोकांच्या सहकार्यासह ही भागीदारी जगातील सर्वात महत्वपूर्ण आर्थिक सेतूंपैकी एक बनू शकते. ज्यात जर्मनी एक केंद्रीय भूमिका वटवू शकतो.

ते म्हणाले की महाराष्ट्र भारताच्या सकल घरगुती उत्पादनात सुमारे 14% योगदान देत आहे आणि औद्योगिक उत्पादन तसेच प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूकीत अग्रणी आहे. एकट्या 2024 मध्ये आम्ही 20 अब्ज डॉलरची प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूकीला आकर्षित केले आहे.जे राष्ट्रीय गुंतवणूकीच्या 31% आहे. या प्रकारे आम्ही एक प्रमुख गुंतवणूक केंद्राच्या रुपात स्वत:ला सिद्ध केले आहे.

# औरंगपूर-कुकडा येथे माती परिषदेचे बेमुदत धरणे आंदोलन सुरूच

## बाळराजे पवार यांची सहा दिवसांत दुसऱ्यांदा आंदोलन स्थळी भेट ;मुख्यमंत्री व पंकजा मुंडे यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे दिले आश्वासन.

गेवराई (प्रतिनिधी):- गेवराई तालुक्यातील औरंगपूर-कुकडा येथे माती परिषदेच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले शेतकऱ्यांचे बेमुदत धरणे आंदोलन सातव्या दिवशीही तीव्रतेने सुरूच असून, शासनाच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांचा संताप उसळला आहे. पूरग्रस्त शेतकरी आपल्या हक्काच्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरले आहेत; परंतु प्रशासन आणि सरकार दोन्ही ठिकाणांहून अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेण्यात आलेली नाही. शेतकऱ्यांच्या या जीवघेण्या संघर्षाची दखल घेण्यासाठी माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे बंधू बाळराजे पवार यांनी दुसऱ्यांदा आंदोलन स्थळी भेट दिली. त्यांनी प्रशासनाशी थेट चर्चा करत आंदोलनातील मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी तहसीलदार व संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या.यानंतर पवार यांनी सांगितले की, आपण तहसीलदार यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी या मागण्यांबाबत जिल्हाधिकारी व कृषी अधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करत कोणती पिके बागायती व कोणती पिके



जिरायती याबाबत मार्गदर्शन देण्यात यावे असे कळवले असून मी स्वतः ही मुख्यमंत्री आणि पंकजा मुंडे यांच्याशी थेट संवाद साधून शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. पूरामुळे जमीन वाहून गेली, पिकं नष्ट झाली,सोलर पंप जळाले,पण शासन व प्रशासन मात्र दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. या आंदोलक शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या पूरामुळे वाहून गेलेल्या जमिनींचे स्वतंत्र पंचनामे करून किमान ₹3 लाखांचे अनुदान द्यावे किंवा पेरणीयोग्य मातीचा भराव करून द्यावा.,तूर,कापूस, सोयाबीन पिकांच्या नुकसान भरपाईसाठी प्रत्येकी ₹01 लाखांची मदत द्यावी., पीककर्ज व तारण कर्ज माफ करून नवीन कर्ज उपलब्ध करून द्यावे.,सोलर पंपांचे नुकसान झालेल्यांना मदत व दुरुस्तीची तातडीने कार्यवाही करावी., बुजलेल्या विहिरी,बोअरवेल व मोटर जळाल्याचे पंचनामे करून अनुक्रमे ₹5 लाख, ₹50 हजार, ₹50 हजार इतके अनुदान थेट खात्यात द्यावे.,रोजगार हमी अंतर्गत शेती पुनरुज्जीवनासाठी कामे सुरू करावीत., फळबागधारकांना प्रति हेक्टर ₹2लाखांचे सरसकट अनुदान द्यावे.,खरीप2024- 25 मधील सर्व पिकांचा विमा मंजूर करून दिवाळीपूर्वी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी.या मागण्यांसाठी गेवराई तालुक्यातील शेकडो शेतकरी एकदिलाने उभे राहिले असून,सरकारने आता कृती केली नाही,तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल,असा इशारा माती परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.दरम्यान,बाळराजे पवार यांनी प्रशासनाला सुनावले की,शेतकऱ्यांच्या मागण्या रास्त असून सरकारने दुर्लक्ष केले,तर या भूमीतून पुन्हा मोठा जनआक्रोश उभा राहील.शेतकऱ्यांची सहनशीलता संपत चालली आहे; शासनाने वेळेत निर्णय घेतला नाही तर आंदोलन तीव्र होईल असे सांगितले तर शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे शासनाने तात्काळ लक्ष देऊन ठोस निर्णय घ्यावा,अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

# शिक्षणमहर्षी ,श्रद्धेय श्री. शिवाजीराव ( दादा ) पंडित - गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते

८८ वर्षांचा प्रेरणादायी प्रवास... आयुष्याच्या प्रत्येक वळणावर समाजासाठी झटणाऱ्या, जनतेच्या मनात घर करणाऱ्या, कार्यातून आदर्श निर्माण करणाऱ्या एका महान व्यक्तिमत्त्वाचा आजचा दिवस — अभिष्टचिंतन सोहळा नव्हे, तर प्रेरणादायी प्रवासाचा उत्सव आहे. राजकारण व समाजकारण यात तत्त्वनिष्ठतेचा, प्रामाणिकपणाचा आणि जनसेवेचा दीप प्रज्वलित ठेवणारे हे व्यक्तिमत्व म्हणजे गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते,राजकारणातील भीष्म पितामह, शिक्षणमहर्षी, माजी मंत्री,श्रद्धेय श्री.शिवाजीराव दादा पंडित. आदरनीय दादांनी सहकार, शिक्षण आणि सामाजिक विकास या तिन्ही क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले आहे. शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य म्हणजे एक युगप्रवर्तक योगदान. बीड जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागात शिक्षण संस्था उभारून त्यांनी ज्ञानाचा दीप प्रज्वलित केला. “शिक्षण हीच खरी प्रगतीची किल्ली” या विचाराने प्रेरित होऊन हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. तसेच त्यांच्या प्रयत्नामुळे



करिअरच्या संधी उपलब्ध झाल्या, आणि त्यामुळे ते समाजातील बदलाची प्रेरणा ठरले. त्यांच्या दूरदृष्टीतून उभ्या राहिलेल्या संस्था आज ज्ञान, प्रगती आणि संस्कार यांचे केंद्र बनल्या आहेत. म्हणूनच त्यांना ‘शिक्षणमहर्षी’ ही उपाधी लाभली आहे.राजकारणात दादांनी प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीचा आदर्श निर्माण केला.नेतृत्व म्हणून त्यांनी जनतेच्या हिताला सदैव प्राधान्य दिले, आणि सत्ता ही जनसेवेच्या साधनापुरती मर्यादित राहावी, याचे उदाहरण स्वतःच्या कार्यातून दाखवले. त्यांच्या प्रत्येक निर्णयात समाजाच्या प्रगतीचा, शेतकऱ्यांच्या कल्याणाचा आणि तरुणाईच्या भविष्याचा विचार दिसतो. समाजकारणातही त्यांचा ठसा अमिट आहे — विकासकामे, बंधारे, सहकारी संस्था, बँका, साखर कारखाना यांसारख्या प्रकल्पांतून शेतकऱ्यांचा आणि स्थानिक समाजाचा विकास साधला, आणि समाजाला आर्थिक बळ दिलं. नागरिकांच्या हितासाठी केलेले कार्य त्यांची योजना, दूरदर्शीपणा आणि कार्यक्षमता आजही आदर्श म्हणून ओळखली जाते. आदरणीय दादांनी त्यांच्या कार्यातून नेहमी दाखवून दिले — “नेतृत्व म्हणजे पद नाही, ती जबाबदारी आहे.” आज त्यांच्या ८८ वर्षांच्या या प्रवासात आपल्याला दिसतो तो सत्य, परिश्रम, भविष्याचा वेध घेण्याचा गुण आणि आत्मसमर्पणाचा संगम.आदरणीय दादांचे आयुष्य म्हणजे एक प्रेरणादायी ग्रंथ आहे — प्रत्येक पानावर आदर्शाची शिकवण आहे. दादांच्या ८८ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तन महोत्सवाच्या माध्यमातून आजही त्यांनी समाज घडवण्याचे कार्य करत एक आदर्श उदाहरण स्थापित केले आहे. अश्या या महान व्यक्तिमत्त्वाचा आज जन्मदिन राजस्थान या राज्याचे महामहीम राज्यपाल मा. श्री. हरिभाऊजी बागडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत गेवराई येथे साजरा होत आहे. त्यांचे अनुभव, कार्य आणि मार्गदर्शन समाजासाठी अशीच प्रेरणादायी ज्योत ठरत राहो. श्रद्धेय,माजी मंत्री श्री. शिवाजीराव (दादा) पंडित यांना जन्मदिनाच्या कोटी कोटी शुभेच्छा.

**लेखक**
**प्रा. अजय पांडुरंग रत्नपारखे**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाचेगाव**

# अटीट्यूट जर्नी चा पहिला उमरा टूर मक्का-मदिना साठी रवाना.

बीड --दि 9/10/2025

अटीट्युट जर्नी ता. आष्टी जिल्हा बीड महाराष्ट्र येथून भारत देशात व देशा बाहेरील एक डझन भर देशातून सुरु करण्यात आली असून टूर सर्व धार्मिक स्थळे मक्का-मदिना बरोबर इतर ऐतिहासिक व प्रेक्षनीय स्थळाची विझिट-दर्शन संपूर्ण माहितीसह प्रवाशांना विजा, विमान तिकीट, हॉटेल बुकिंग, बस-टेक्सी सेवा पुरवणे, देशी खाद्य सेवा उपलब्ध करून देते. सदर टूर सेवा बीड जिल्हातील नागरिका बरोबर महाराष्ट्रतील नागरिकांना मोफत दारात एक विश्वनीय देणायचा प्रयत्न करत आहे.

बीड जिल्हतील पाहिली टूर पथक माका-मदिना साठी मा.मिर्झा उबेद बेग संचालक व मा. मिर्झा शाहनवाज बेग मुख्य संचालक यांनी शेकडो च्या साक्षीने हिरवी



झेंडी दाखून रवाना केली. यावेळी मा. मिर्झा नियामत बेग मा. शिक्षण सभापती जिल्हा परिषद बीड, मा. अडो शेख शफिक भाऊ ए,आई,एम,आई एम बीड,हज कमेटी बीड चे संचालक काजीं नजीब,जिल्हा वक्फ ऑफिस शेख शोएब,शिक्षक नेते, रशीद खान, शेख मुसा,पेन्शनर संघटनेचे अध्येक्ष वजिर शेख, इंजिनिअर सय्यद मुजाहेद, शेख रशीद सर,व्यापारी-मजूर संघटनेचे शेख मुस्ताक, शेख कदीर उस्ताद, शेख राजू पटेल, सिकंदर पटेल,शेख मतीन,काजीं मुशाहेंद,शेख मंजूर सर, पठाण नईम खान,अलीम मोमीन, मोहंमद इसहाक, मोमीन करीम,सिद्दीकी बशीर,सय्यद अवेजअली, शेख मुद्दशीर, शेख अय्याज, शेख रज्जाक यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. या वेळेस उपस्थित ग्राहक -प्रवाशांना टूर चे मुख्य संचालक मिर्झा शानवाज बेग यांनी एक विश्वासार्य सेवा देणाचा संकल्प केलाअसून टूर चे मुख्य कार्यालय बशीर गंज येथे सेवेसाठी सुरु केले आहे.

# घरकुल कर्मचाऱ्यांच्या विरोधात पंचायत समिती समोर अखंड हरिनाम सप्ताह

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा पंचायत समिती येथील घरकुल विभागाचे कर्मचारी बेकायदेशीररित्या घरकुलांचे हप्ते देत आहेत. परंतु ज्यांची घरकुल बांधून पूर्ण झाली आहेत त्यांना बेसमेंटचे फोटो दाखवा मला का नाही सांगितले अशी कारणे देवून त्यांना घरकुलांचे बिलापासून जाणीवपूर्वक बाजूला ठेवले जात आहे. या कारणांमुळे चुंबळी ग्रामस्थांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह आंदोलन करण्यात येत आहे. मौजे चुबळी या गावात अनेक ग्रामस्थांना घरकुल मंजूर होऊन बेसमेट काम करुन सुध्दा बील काढले जात नाही आणि जे घरकुलांचे हप्ते सोडले आहेत त्यांचे कोणाचेही बेसमेट जिओट?कचे फोटो आपले कार्यालयकडे नाहीत तसेच ते संपुर्ण आपले कार्यालयाणे




जाणीवपूर्वक काही कर्मचारी यांना चुंबळी येथील घरकुलांचे हप्ते देवू नका असे कळविले समजते. पुढे आंदोलकाने निवेदनामध्ये नमूद केले आहे की आमचे त्वरीत चुंबळी येथील सर्व घरकुलांचे दुसऱ्या हप्त्याचे वितरण करावे व दोषी कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे निलंबन करण्यासाठी आज गुरुवार दि. ९ आक्टोंबर २०२५ रोजी चुंबळी ग्रामस्थांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात गोरख झेंड, अविनाश नागरगोजे, नरहरी पवळ, भरत नागरगोजे,दत्तु पवळ, दिनकर नागरगोजे, का?. महादेव नागरगोजे, मोहन पवळ, महादेव नागरगोजे, शिवाजी पव्हणे, विशाल मळेकर, सतिश सिरसाठ, सह आदी उपस्थित होते.

## उपरोक्त संदर्भिय पत्रकान्वये घरकुलाचे हप्ते सोडणे विषयी आपण आज दिनांक 09/10/2025

रोजी पंचायत समिती पाटोदा कार्यालया समोर अंखड हरिनाम सप्ताहाचे अंदोलन करित अहात. आपणास विनंती करण्यात येते की, सदरील घरकुलाचे हप्ते दिनांक 14/10/2025 रोजी नंतर मा.गविअ यांच्या सुचने नुसार घरकुलाचे हप्ते सोडणे बाबत कार्यवाही करण्यात येईल. सदर पंचायत समिती पाटोदा कार्यालया समोरील अंखड हरिनामाचे सप्ताहाचे आयोजन स्थगोत करण्यात यावे ही विनंती.

**गट विकास अधिकारी वर्ग-1 पंचायत समिती पाटोदा**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## आयुष्यात कधी वाटलं नव्हतं की...हौस कशी पूर्ण करायची?




गेल्या काही दिवसांपासून सोन्याचा भाव सातत्याने वाढत आहे. आज तर सोने आणि चांदी या दोन्ही मौल्यवान धातूंच्या भावाने विक्रमी उच्चांक गाठला. दोन दिवसात चांदीच्या दरामध्ये तब्बल 15000 रुपयांनी तर सोन्याचे दरात पाच हजार रुपयांची वाढ झाली आहे. सध्या सणासुदीचे दिवस आहेत. या काळात लोक मोठ्या प्रमाणात सोने, चांदीची खरेदी करतात. मात्र सततच्या भाववाढीमुळे आता सोने खरेदी करणाऱ्यांपुढे मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत.

दिवाळीत सोनं आणखी महागणार?

जळगावातील सराफा बाजारात सोने-चांदीच्या दरात गेल्या दहा दिवसांकडून दररोज वाढ होत आहे. आज केवळ चांदीच्या दरात एक तासात तब्बल सात हजार रुपयांची विक्रमी वाढ झाली. दोन दिवसात चांदीच्या दरामध्ये तब्बल 15000 रुपयांनी वाढ नोंदवण्यात आली. चांदीसोबतच सोनेदेखील तेवढेच चकाकत आहे. दोन दिवसांत सोन्याच्या दरात तब्बल पाच हजार रुपयांची वाढ झाली आहे. सोन्या आणि चांदीचे दर वाढण्यामागची वेगवेगळी कारणं असल्याचे सराफा व्यावसायिकांचे म्हणणे आहे. दिवाळीत आणखी भाव वाढतील अशी शंका व्यक्त केली जात आहे. म्हणूनच ग्राहक आजपासूनच सोने, चांदी खरेदी करण्यासाठी गर्दी करत असल्याचे देखील सराफ व्यावसायिक म्हणाले आहेत. सतत चार दिवसांपासून सोने, चांदीच्या दरात होत असलेल्या विक्रमी वाढीमुळे जळगावचे ग्राहक तसेच सराफ व्यवसायिकदेखील चक्रावले आहेत. सोने, चांदीचा सध्याचा भाव किती?

जळगावच्या सराफा बाजारात चांदीच्या दरात विक्रमी वाढ पाहायला मिळाली. येथे एका तासात चांदीच्या दरात तब्बल 7 हजारांची वाढ झाली. चांदीचा दर जीएसटीस 1 लाख 67 हजार रुपयांवर पोहोचला आहे. सकाळी बाजार सुरू झाल्यानंतर चांदीचा दर विना GST 1 लाख 55 हजार रुपयांवर होता. दुपारी 2 वाजेपर्यंत हाच दर कायम होता. नंतर मात्र दुपारी 3 वाजता चांदीच्या दरात तब्बल 7 हजारांनी वाढ झाली. सोन्याच्या दरातदेखील 500 रुपयांनी वाढ झाली असून सोन्याचा दर विना जीएसटी 1 लाख 23 हजार रुपयांवर पोहोचला आहे. सोन्या चांदीच्या दरात सलग चार दिवसांपासून मोठी वाढ होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

सोने खरेदीदार हैरान, म्हणतात सण कसे साजरे करायचे?

दरम्यान, सोने-चांदीचा भाव वाढत असल्याने दागिने खरेदी करण्यासाठी आलेल्या महिलावर्गामध्ये नाराजी दिसून आली. सोने, चांदीचे भाव एवढे वाढत असतील तर आम्ही खरेदी कशी करावी, असा प्रश्न या महिलांपुढे उभा राहिला आहे. स्वप्नातही विचार केला नव्हता की भाव सोन्याचे आणि चांदीचे भाव एवढे वाढतील, असे मत जळगावच्या सराफा बाजारातील एका महिला ग्राहकाने व्यक्त केले. सोन्याचा भाव प्रचंड भाव वाढल्यामुळे आता 24 कॅरेट सोन घेणं शक्य नसल्याने 22 कॅरेट तसेच 18 कॅरेट सोन्याच्या दागिन्यांमध्ये हौस भागविण्याची वेळ आल्याच महिलांचं म्हणणं आहे. अनेक जण दिवाळीच्या मुहूर्तावर सोने खरेदी करत असतात. मात्र दिवाळीत पुन्हा भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेता ग्राहक आहे त्या भावात आजच सोने खरेदी करत असल्याचे पाहायला मिळत आहे. दागिन्यांचे भाव वाढल्यामुळे हौस पूर्ण करण्यासाठी आता बेन्टेक्सचे दागिने वापरण्याची वेळ आली असल्याचेदेखील महिलांचे म्हणणे आहे.

# खा.बजरंग सोनवणे मुंबईवरून आले असे कपिलधारवाडीत गेले; जमिनीला पडलेल्या भेगांची केली पाहणी

बीड: बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात जमिनीतील भेगा व जमीन खचणे असे प्रकार घडल्याने नागरिक भयभीत आहेत. या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (GSI), भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिलेले आहे. दरम्यान, दि.७ रोजी खा.बजरंग सोनवणे हे मुंबईवरून बीड जिल्ह्यात दाखल झाले. आल्या आल्या त्यांनी केजला न जाता



कपिलधारवाडीत जात भेगांची पाहणी केली. कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे. अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत. अनेक ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# तेली समाजाला नगरपालिकेत प्रतिनिधित्व देण्याची तेली समाजाची मागणी

परळी वैजनाथ दि.०९ ( प्रतिनिधी) नगरपालिकेच्या निवडणूकीचे बिगूल वाजायला सुरुवात झाली असून माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे साहेब यांनी तेली समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी देण्याची मागणी तेली समाजातील नागरिकांनी केली आहे. यापूर्वी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली समाजाला प्रतिनिधित्व दिल्याने तेली समाजातील नगरसेवक, तसेच संस्थांवर संचालक निवडून आले होते.

नगरपालिकेच्या निवडणूकीचे बिगूल वाजायला सुरुवात झाली असून नगराध्यक्षपद व नगरसेवकांचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यामुळे ईच्छूक नगराध्यक्ष व नगरसेवक निवडणूकीच्या तयारीला लागले असून प्रभागात भेटीगाठी सुरू केल्या आहेत. शहरात तेली समाज मोठ्या संख्येने आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे


प्रशासकीय इमारत नगर परिषद परळी वै

यांच्या नेतृत्वाखाली समाजाला विविध ठिकाणी प्रतिनिधित्व देण्यात आले होते. यावेळी नगरसेवक निवडून आले होते. तसेच वैद्यनाथ बँकेत स्वर्गीय गोविंद आप्पा व्यवहारे, विठ्ठल आप्पा चौधरी अनेक वर्षे संचालक, व्हाइस चेअरमन होते. गोविंद आप्पा व्यवहारे बीड जिल्हा बँकेवर संचालक होते. विठ्ठल आप्पा चौधरी यांना खादी ग्रामोद्योगवर संधी दिली होती. वर्षा नरेश पिंपळे या नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या. मात्र गेल्या काही वर्षात तेली समाजाला नगरपालिकेत किंवा इतर कुठेही प्रतिनिधित्व देण्यात येत नाही. यामुळे समाजात नाराजी पसरली आहे. आता होणाऱ्या आगामी निवडणुकीत तेली समाजातील नागरिकांना नगरपालिकेत प्रतिनिधित्व देण्यात यावे. तेली समाजाबद्दल स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, जितके साथ तेली वो भाग्यशाली या उक्तीने समाजाला प्रतिनिधित्व देण्यात यावे अशी मागणी समाजाकडून महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सचिव प्रा मधुकर शिंदे व समाजातील नागरिकांनी मंत्री पंकजा मुंडे व आमदार धनंजय मुंडे साहेब यांच्याकडे करण्यात आली आहे.

# जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्रच्या उच्चस्तरीय प्रतिनिधीमंडळाचा राज्यातील पूरग्रस्त भागांना दौरा

### शासनाने शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५०,००० नुकसानभरपाई द्यावी आणि पुनर्वसन युद्धपातळीवर करावे : सय्यद जमीर कादरी









08 October 2025 परळी प्रतिनिधी: अलीकडील काळात महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे विशेषतः मराठवाडा विभागात मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. शेतीपिके आणि घरे उद्धस्त झाली असून काहींचा जीवही गेला आहे. या नुकसानीचे मूल्यमापन करण्यासाठी जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्र आणि शेतकरी विकास मंच यांच्या उच्चस्तरीय प्रतिनिधीमंडळाने पूरग्रस्त भागांचा दौरा केला, पीडितांची स्थिती जाणून घेतली आणि तात्काळ मदतकार्य सुरू केले. जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्र, युथ मूव्हमेंट महाराष्ट्र आणि एसआयओ (स्टुडंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन) सुमारे १,३०० किलोमीटर परिसरात सर्वेक्षण करून सविस्तर अहवाल तयार करत आहेत. या प्रसंगी मुआविन अमीर-ए-हलका (राज्य उपाध्यक्ष) सय्यद जमीर कादरी यांनी महाराष्ट्र शासनाला विनंती केली की शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ₹५०,००० ची नुकसानभरपाई द्यावी आणि पीडितांचे पुनर्वसन तातडीने सुनिश्चित करावे. सय्यद जमीर कादरी यांच्या नेतृत्वाखालील या प्रतिनिधीमंडळाने नेर, जालना, पाथरी, परभणी, नांदेड, उमरगा, देगलूर, गोब्याल, ओसा, लातूर, लोखेगाव, मजलगाव आणि बीड या जिल्ह्यांतील अनेक पूरग्रस्त खेड्यांना भेट दिली. नद्या आणि कालव्यांच्या काठावर असलेली खेडी पूर्णतः उद्धस्त झाल्याचे आढळले, आणि शेतकऱ्यांची पिके पूर्णपणे नष्ट झाली होती. या प्रतिनिधीमंडळाने शेतकऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या तक्रारी ऐकल्या, त्यांचे नुकसान पाहिले आणि जमाअत तसेच संलग्न संस्थांकडून सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांना त्यांचा नुकसानीचा सविस्तर अहवाल संबंधित शासकीय विभागांना सादर करण्याचा सल्ला देण्यात आला. स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, शासनाकडून अद्याप कोणतीही मदत किंवा सर्वेक्षण पथक त्या भागात पोहोचलेले नाही. प्रतिनिधीमंडळाने सरपंचांशी भेट घेऊन त्यांना गावात सर्वेक्षण करून अचूक नुकसानीचा अहवाल सरकारकडे पाठवण्याचे आवाहन केले, जेणेकरून योग्य ती मदत मिळू शकेल. तात्काळ मदत म्हणून प्रतिनिधीमंडळाने नांदेड येथे पूरात बुडून मृत्यू पावलेल्या दोन व्यक्तींच्या कुटुंबीयांना रोख मदत दिली. तसेच नेरमधील चार, पाथरीमधील पाच, आणि उमरगा येथील दोन कुटुंबांना मदत करण्यात आली. त्याचबरोबर राशन किट्स, अन्नसामग्री, चादरी आणि चटया वितरित करण्यात आल्या. शेतकऱ्यांना आश्वासन देण्यात आले की शेतकरी विकास मंच प्रती हेक्टर ₹५०,००० नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी शासनाशी प्रयत्न करेल आणि इतर शासकीय योजनांमधूनही त्यांना लाभ मिळवून देईल. सर्व पूरग्रस्त भागांचे सर्वेक्षण सुरू असून त्यावर आधारित वास्तविक स्थितीचा अहवाल सरकारकडे सादर केला जाईल, ज्यामुळे पीडितांना आपले जीवन पुन्हा उभे करण्यास अडचण येणार नाही. या प्रतिनिधीमंडळात शेतकरी विकास मंच महाराष्ट्र चे अध्यक्ष हुसैन खान, जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्र चे राजकीय व राष्ट्रीय व्यवहार सचिव अब्दुल मुजीब, तसेच जमाअत आणि शेतकरी विकास मंच चे स्थानिक प्रतिनिधी व सदस्य सहभागी होते.

# लताबाई हातागळे नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लढावा

## महिला सक्षमीकरण, सामाजिक कार्य आणि लोकसेवा या माध्यमातून बीड नगरपालिकेच्या जनतेचा विश्वास संपादन

बीड :
महिला सक्षमीकरण, गरजवंतांची सेवा आणि समाजहिताची निस्वार्थ भावना या मूल्यांवर काम करणाऱ्या लताबाई धोंडीराम हातागळे या येत्या बीड नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी योग्य आणि पात्र उमेदवार म्हणून जनतेतून चर्चेत आहेत. अनेक वर्षांपासून त्यांनी बीड शहरातील गरीब, वंचित आणि महिलांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्यामुळे त्या जनमानसात आपले स्वतंत्र स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. लताबाई हातागळे यांनी कोरोना काळात तब्बल तीन हजार कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. तसेच त्यांनी बचत गटाच्या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य केले असून आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ७५ पेक्षा अधिक महिला स्वयंसहायता गटांमध्ये कार्यरत आहेत. समाजातील दुर्बल घटकांना शासनाच्या विविध योजना थेट पोहोचविण्यासाठी त्यांनी स्वतंत्र मीडिया सेंटर स्थापन केले, जे पूर्णतः निशुल्क चालविले जाते. याशिवाय बीड शहरात त्यांनी ३०० पेक्षा अधिक लोकांना रमाई घरकुल योजनेअंतर्गत घर उपलब्ध करून दिले, तर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १०० पेक्षा जास्त कुटुंबांना पक्के घर मिळवून दिले. रुग्णांसाठी रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, तंटे मिटविण्याचे उपक्रम तसेच पूरग्रस्त भागांतील नागरिकांना प्रत्यक्ष मदत हे त्यांचे कार्य विशेष ठरले आहे.

> लताबाई हातागळे यांनी कोरोना काळात तब्बल तीन हजार कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

लताबाई हातागळे यांचे पुत्र, युवा नेते विनोद धोंडीराम हातागळे यांनी त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत सामाजिक कार्यात मोठे योगदान दिले असून त्यांच्या प्रेरणेनेच लताबाई हातागळे जनसेवा अधिक प्रभावीपणे पुढे नेत आहेत. बीड शहरात गेल्या काही वर्षांत महिला





नेतृत्वाला नवी दिशा मिळताना दिसत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी, महिलांना सबलीकरण मिळावे आणि गरिबांना शासनाच्या योजनांचा थेट लाभ व्हावा, हे ध्येय ठेवून लताबाई हातागळे यांनी कार्य केले आहे. त्यांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि नागरिकाभिमुख दृष्टी आढळते.

शहरातील नागरिकांचा प्रतिसाद पाहता, त्यांची उमेदवारी ही केवळ राजकीय नव्हे तर जनतेच्या मनातील नैसर्गिक निवड म्हणूनही पाहिली जात आहे. बीड शहराच्या विकासासाठी आणि सामाजिक समतेसाठी लताबाई हातागळे या योग्य नगराध्यक्ष ठरतील, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

.......................

रुस्तुम बेद्रे
राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी अजित पवार गट

# सोयाबिन शेतकऱ्याचा 4 लाखांचा चेक बँकेतून चोरीला गेला,घोर कलियुग आले

सोयाबिनच्या मिळालेला चार लाखांच्या बिलाचा चेक बँकेच्या ड्रॉप बॉक्समधून चोरट्याने लंपास करत परस्पर दुसऱ्याच खात्यावर वटवला असल्याची धक्कादायक घटना सोलापूरातील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत घडली आहे. या संदर्भात शेतकऱ्याने पोलिसात धाव घेतली असून न्याय देण्याची मागणी केली. विशेष म्हणजे आधी बँकेने या शेतकऱ्याला चेक दिलाच नसल्याचा दावा करीत फेटाळून लावले होते. परंतू सीसीटीव्हीतून चेक दिल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करीत तपास सुरु केला आहे.

सोलापूरात दोन शाखांमध्ये चेक चोरीला गेल्याची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. एका शेतकऱ्याचा चार लाखाचा चेक चोरीला गेला आहे. या संदर्भात बँक ऑफ महाराष्ट्राच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला अर्ज दिलेला आहे, त्यामध्ये ठेवीदाराचा चेक चोरीला गेला असा उल्लेख आहे असे सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी म्हटले आहे. चोरट्याने चेकच्या स्लिपमध्ये काही तरी दुरुस्ती करण्याच्या कारणाखाली तो ड्रॉप बॉक्समधून काढून घेतला आणि बँक कर्मचाऱ्याची नजर चुकवून त्यात चुकीच्या पद्धतीने वापर करून वेगळ्या खात्यातील पैसे ट्रान्सफर करून घेतल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात बँक मॅनेजरने विजापूर नाका पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी पाठवण्यात आल्याचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी सांगितले आहे. बँक ऑफ महाराष्ट्रच्या नवी पेठ शाखेतून एका अज्ञात व्यक्तीने बँकेच्या चेक बॉक्समधून चेक चोरल्याचे उघडकीस आले आहे. हा चेक



अमर तेपेदार नामक व्यक्तीने चोरल्याची तक्रार पोलीस आयुक्तांकडे गेली आहे.या संदर्भात बँक प्रशासनाने माध्यमांना कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. आमची कार्यालयीन प्रक्रिया सुरु असल्याचे बँकेने स्पष्ट केले आहे. शेतकऱ्याला सोयाबीनच्या बिलापोटी मिळालेला चेक बँकेत भरल्यानंतर तो चोरून त्यात बदल करत संबंधित चोराने वटवला आहे. बँकेने मात्र शेतकऱ्याला पैसे देण्यासाठी नकार दिला आहे. सुरुवातीला संबंधित शेतकऱ्याने बँकेत चेक भरलाच नसल्याचा कांगावा बँकेकडून केला गेला. मात्र सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर बँकेने चूक मान्य केली आहे. सोलापुरातील बँक ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीयकृत बँकेचा भोंगळ कारभार त्यामुळे समोर आला आहे.

मूळचे बार्शीतील असलेल्या उत्तम दत्तात्रय जाधव या शेतकऱ्याच्या नावाचा तब्बल 4 लाख रुपयांचा चेक त्याच्याच खात्यावर जमा होणे अपेक्षित असताना अनोळखी माणसाच्या नावावर त्याचे पैसे जमा झाल्याने शेतकऱ्याची अवस्था बिकट झाली आहे. गेल्या सात ते आठ दिवसापासून संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे अधिकारी या शेतकऱ्याला टोलवाटोलवी उत्तरे देत होते. त्यानंतर सोयाबीन उत्पादक शेतकरी उत्तम जाधव यांनी यासंदर्भात पोलिसांकडे धाव घेतली

# एकनाथ शिंदेंचा बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात; शेकडो शेतकऱ्यांना मदत किटचे वाटप!

बीड, प्रतिनिधी – अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीने शेतकरी व नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या भीषण परिस्थितीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरणा मानत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसद रत्न खासदार मा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यात आला. शिवसेना कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी



दुपारी १२ वाजता सिंदफना नदीकाठच्या पूरग्रस्त गावातील शेतकऱ्यांना मदत कीट वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे पूरग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याचे कार्य करण्यात आले.

या वेळी ठाणे उपजिल्हाप्रमुख राजेश कदम आणि बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले की, “मदतीचे तोरण हेच शिवसेनेचे धोरण आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मदतीचा हात पुढे केला आहे.”

मदत वाटप कार्यक्रमापूर्वी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पंचक्रोशीतील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. या वेळी उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, डोंबिवली नगरसेवक राजन मराठे, नगरसेवक अंबरनाथ सुभाष साळुंखे, डोंबिवली युवासेना अध्यक्ष सागर जेधे, उपतालुका प्रमुख राहुल गणपुले, युवासेना विधानसभा अध्यक्ष सूरज मराठे, संजय निकते आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, बीड कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती शामसुंदर पडुळे, शिवसेना, युवासेना, व्हीजेएनटी सेना, शेतकरी सेना व एसटी कामगार सेनेचे पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे शिवसेनेने पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेत आपले सामाजिक बांधिलकीचे धोरण अधोरेखित केले.
ooooo

### लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य च्या अलताफ शेख, अब्दुल अजीम, अशाताई यांच्या निवडी जाहीर सिल्लोड ता. अध्यक्ष



लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य च्या अलताफ शेख यांची सिल्लोड ता. अध्यक्ष , अब्दुल अजीम सिल्लोड शहर अध्यक्ष, अशाताई अजिंठा सर्कल पदी यांच्या निवडी सं. अ. बीबी वैद्य राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंखे, प्रदेश सचिव गणेश जगदाळे यांच्या आदेशानुसार निलोफर शेख महिला प्रदेश अध्यक्ष (उत्तर महाराष्ट्र ), प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद यांनी जाहीर केल्या. लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने लोकशाही सुविधा केंद्र यावेळी चालू करण्यात आले. याठिकाणी सर्व शासकीय योजनाचे ऑनलाईन अर्ज करतात येतात.

### सुदामा कृष्ण भेटीने भागवत कथेचा झाला समारोप आज होणार शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा



गेवराई दि.९ (प्रतिनिधी) माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेचा समारोप कृष्ण सुदामा च्या भेटीने करण्यात आला. यावेळी भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेची सांगता केली. यावेळी त्यांनी सुदामा कृष्ण भेट कथन केली त्यावेळेस उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू उभा राहिले. याप्रसंगी माजी मंत्री शिवाजीराव पंडित, आ. विजयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासहहभाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त समाधान समाधान महाराज शर्मा यांच्या भागवत कथेचा समारोप झाला. यावेळी गेवराई शहरासह ग्रामीण भागातून भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिष्टचिंतन सोहळा समितीने परिश्रम घेतले.

# मच्छिमार बांधवांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान, भिमा गहीरे

## मत्स्य विभागाचे अधिकारी यांनी केली भोई वस्तीवरील मच्छीमार बांधवांच्या नुकसानीची केली पाहणी..

वडवणी बीड प्रतिनिधी. अंकुश गवळी

बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवा प्रमाणे च मच्छीमार बांधवांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सन 2025 या पावसाळी हंगामात माहे सप्टेंबर महिन्यात जिल्हा वर झालेल्या नैसर्गिक अतिवृष्टीमुळे सर्वत्र पूरस्थिती मच्छीमार बांधवांचे खूप मोठ्या प्रमाणात



नदीकाठचे नुकसान झाले आहे , यामध्ये तलावात मच्छी बीज साठवणूक केलेली असेल. त्यांचे जाळे असतील. त्यांची होडी असतील व त्यांचे संसार उपयोगी वस्तू असतील तलावा किनारी गोदावरी नदी किनारी असेल. हे सर्व अतिवृष्टी मध्ये पाण्याच्या प्रवाहामध्ये सर्व वाहून गेले .यामुळे मच्छीमार बांधवांवर उपासमारीची वेळ आली आहे . युवाशक्ती मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्यादित देवगाव या संस्थेच्या मार्फत पाठपुरावा केल्यानंतर दि 6/10/2025 रोजी मत्स्य विभागामार्फत डॉ भूषण साहेब व अजय मिश्रे साहेब यांनी येऊन अतिवृष्टी मुळे झालेल्या मच्छीमारांचे बांधवांचे नुकसानाचे पंचनामे करण्यात आले .यावेळी उपस्थित संस्थेचे सभासद व पदाधिकारी व मच्छीमार बांधव उपस्थित होते, यावेळी तात्काळ मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी भोई समाजाचे जिल्ह्याचे नेते भीमा गहीरे यांनी प्रशासनाकडे केले आहे

# अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांचे ऑक्टोबर महिन्याचे वेतन वाढीव टप्प्यानुसार करा

## बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे शिक्षणाधिकारी आणि वेतन अधीक्षकांना निवेदन !

बीड दि.06 (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यातील विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील कार्यरत असणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा 20% वाढीव टप्पा शासनाने मंजूर केला आहे. शिवाय 01 ऑगस्ट 2025 पासून या शिक्षकांच्या खात्यात वाढीव टप्प्यानुसार वेतन देण्याचे शासनाने जाहीर केले. परंतु अद्यापही 20 टक्के वाढीव टप्प्यानुसार या शिक्षकांच्या खात्यात वेतनाची रक्कम जमा झाली नाही. किमान दिवाळी सणाच्या निमित्ताने या सर्व शिक्षकांचे वेतन 20 टक्के वाढीव टप्प्यानुसार व्हावे, त्यासाठी लागणाऱ्या निधीची शासनाकडे मागणी करावी या मागणीचे निवेदन बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्यासह वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हयातीलअंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांचे ऑक्टोबर महिन्याचे वेतन वाढीव टप्प्यानुसार करा या मागणीचे निवेदन बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील मॅडम आणि वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना दिले. त्यानंतर शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम पदाधिकाऱ्यांशी बोलताना म्हणाल्या की, राज्यातील सर्व विनाअनुदानित शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्या



दृष्टीने काम सुरू आहे. जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी आम्ही वरिष्ठ कार्यालयाच्या सातत्याने संपर्कात आहोत. त्यांचे योग्य मार्गदर्शन मिळताच क्षणांचा ही विलंब न करता आपले वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन देऊन सर्व अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात त्यांचे हक्काचे वेतन जमा करू असे आश्वासन दिले. दुसरीकडे वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना ही निवेदन दिले. या वेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांना आपली मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे कळवली जाईल व वाढीव टप्प्यासाठी लागणारा आवश्यक निधीची मागणी करून अंशतः अनुदानित शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. दोन्ही अधिकाऱ्यांनी दिवाळीच्या पूर्वी वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन खात्यात जमा होणार या दिलेल्या आश्वासनांमुळे निश्चितच दिवाळी गोड होईल असा विश्वास व्यक्त करत जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

या निवेदनावर विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, महिला आघाडीच्या मराठवाडा सचिव श्रीमती मुक्ता मोटे मॅडम, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे, प्राचार्य तुकाराम खाडे, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रताप पवार, जिल्हा उपाध्यक्ष रामदास जामकर, अरविंद सौंदलकर, जिल्हा सचिव शेख सर, श्री देशमुख, बीड तालुका अध्यक्ष भागवत यादव, बाळासाहेब नागरगोजे, सय्यद रिजवान, अशोक मोरे, सुरेश कदम, पृथ्वीराज राऊत, नितीन बिनवडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com